तरुण भारत
Apla Nagpur | 2022-04-25 | Page- 1
epaper.tarunbharat.net

# डिजिटल आव्हानांना सामोरे जा

## • एस. एन. सुब्रमण्यम यांचे आवाहन • आयआयएम नागपूरचा दीक्षान्त समारोह

◆ **नागपूर, २४ एप्रिल**

वेगाने आपण 'डिजिटल' युगाकडे झेपावत असून हेच आपले भविष्य राहणार आहे. नवनवीन संधी घेऊन येणाऱ्या या 'डिजिटल' जगातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी तयार रहा, असे आवाहन लार्सन अँड टुब्रोचे सीईओ व व्यवस्थापकीय संचालक एस. एन. सुब्रमण्यम यांनी विद्यार्थ्यांना केले.

इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट नागपूरच्या चौथ्या, पाचव्या आणि सहाव्या बॅचचा दीक्षान्त समारोह रविवारी इन्स्टिट्यूटच्या मिहान परिसरात पार पडला. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी लार्सन अँड टुब्रोचे सीईओ व व्यवस्थापकीय संचालक एस. एन. सुब्रमण्यम होते तर आयआयएम नागपूर बोर्ड ऑफ गव्हर्नन्सचे अध्यक्ष सी. पी. गुरनानी व आयआयएम नागपूरचे संचालक डॉ. भीमराया मेत्री यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते

यावेळी विद्यार्थ्यांना विविध सुवर्णपदकांसह पदव्या वितरित करण्यात आल्या.एस. एन. सुब्रमण्यम म्हणाले, ''शिकण्याची प्रक्रिया सुरूच ठेवा. संगीत, वाद्य, खेळ आदी कौशल्य आत्मसात करा. कोणतेही काम उत्तमच करा.'' सुरुवातीला सी.पी. गुरनानी यांनी पालक व विद्यार्थ्यांचे स्वागत केले. कोरोना महामारीच्या प्रादुर्भावामुळे मागील दोन वर्षे दीक्षान्त समारोह होऊ शकला नाही. त्यामुळे या दोन वर्षांसह यावर्षीचा दीक्षान्त सोहळा घेण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

छोट्या गावातून आलेल्या एस. एन. सुब्रमण्यम यांचे आदर्श उदाहरण तुमच्यासमोर असल्याचे त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले. आयआयएम नागपूरचे संचालक डॉ. भीमराया मेत्री यांनी आयआयएमच्या कार्याचा आढावा घेतला.

◀ *(तभा वृत्तसेवा)*



सुब्रम्हण्यम यांचे स्वागत करताना सी. पी. गुरनानी. सोबत भीमराया मेत्री व अन्य मान्यवर

### ४२४ विद्यार्थ्यांना पदवी व पुरस्कार

दीक्षान्त समारोहात एकूण ४२४ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली. सोबतच, बेस्ट स्कोलास्टिक परफॉर्मन्स अवॉर्ड २०१८-२० साठी अंकिता जोशी हिची तर २०१९-२१ साठी

इना गुप्ता हिची निवड करण्यात आली. ऑलराऊंडर परफॉर्मन्स अवॉर्ड २०१८-२० साठी टी. भरत याला तर २०१९-२१ साठी शेख फरीद अहमद याला प्रदान करण्यात आला. बेस्ट स्कोलास्टिक अचिव्हमेंट इन्स्टिट्यूट अवॉर्ड डिम्पी खुराना हिला तर बेस्ट ऑलराऊंडर परफॉर्मन्स इन्स्टिट्यूट अवॉर्ड समृद्धी कोळी हिला प्रदान करण्यात आला. कॅनरा बँक पुरस्कृत पुरस्कार सौरभ भार्गवला तसेच, बँक ऑफ बडोदा पुरस्कृत पुरस्कार चिन्मय मिश्रा, वैष्णवी अरकोट व प्रगती लोहानी यांना दीक्षांत समारोहाच्या पूर्वसंध्येला प्रदान करण्यात आले. ■

Powered by iDocuments